**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान**
**मागदर्शक सूचना**

**जा.क्र.मराफऔवमे/एफविअ/मार्ग.सूचना/१७-१८/१८९७/१७**
**पुणे, दि.०३/०७/२०१७.**

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक....................(सर्व)**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी..................... (सर्व)**

**विषय :- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (सन २०१७-१८) अंतर्गत घटक / प्रकल्प अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करणेबाबत...**

**संदर्भ** :-१. केंद्र शासनाचे, कृषि सहकारिता व किसान कल्याण विभागाचे ई-मेल पत्र F.No.33-17/2017-MIDH (AAP) दि. २९/०६/२०१७.
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मराफऔवमं/सनि/वाकृआ/अंमलबजावणी/१७८६/२०१७, दि. १६/०६/२०१७.

केंद्र शासनाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रू. १४८.२९ कोटी रक्कमेच्या नवीन वार्षिक कृति आराखडयास तसेच रू. १४.०७ कोटी रक्कमेच्या सन २०१६-१७ मधील स्पिल ओव्हर कार्यक्रमास संदर्भ क्रं. १ अन्वये, मंजूरी दिलेली आहे. आपल्या जिल्हयाकरीता सन २०१७-१८ चा वार्षिक कृति आराखडयास संदर्भ क्र. २ अन्वये मंजूरी देण्यात आली असून भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहून कोणताही बदल न करता संदर्भिय पत्रातील सूचनांचे पालन करुन कार्यक्रम अंमलबजावणी सुरु करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

तरी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत घटकांची / प्रकल्पांची अधिक परीणामकारक व यशस्वी अंमलबजावणी होण्याकरीता लाभार्थी निवड पध्दती, लक्षांक वाटप, पूर्वसंमती व कार्यारंभ आदेश इत्यादीबाबत खालील नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा जाणीवपूर्वक अवलंब करण्यात यावा.

**१. अभियानांतर्गत प्रकल्पासाठी अर्ज प्राप्त करुन घेण्याकरीता कार्यपध्दती :-**

- आपल्या जिल्हयाकरीता मंजूर वार्षिक कृति आराखडयातील भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत घटक / प्रकल्पाकरीता तालुकानिहाय लक्षांक वाटप करण्यात यावे व त्यानुसार विहीत नमुन्यात http://www.hortnet.gov.in या संकेत स्थळावर शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज प्राप्त करुन घेण्याकरीता जिल्हास्तरावरुन आपल्या जिल्हयातील प्रमुख दैनिक वर्तमान पत्रातून तसेच आकाशवाणी व इतर माध्यमातून जाहिरात देण्यात यावी. दि.१०.०७.२०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दि.३१.०७.२०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात यावेत.
- क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे सदर योजनेबाबत गावपातळीवर ग्रामसभाद्वारे प्रचार व प्रसार करण्यासाठी सूचना द्याव्यात, जेणेकरुन योजनेची माहिती सर्व शेतकऱ्यापर्यंत पोहचण्यास मदत होईल. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जाहीरातीची प्रत पंचायत समिती व ग्रामपंचायत फलकावर प्रसिध्द करण्यात यावा. जाहिरातीमध्ये अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, स्थळ, वेळ इत्यादी नमूद करण्यात यावी.
- अभियानांतर्गत प्रकल्पांचा लाभ घेण्याकरीता अर्ज करण्यासाठी हॉर्टनेट प्रणाली वापरली जाते. शेतकऱ्यांना अर्ज करण्याकरीता अधिक सुलभता व्हावी याकरीता केंद्र शासनाने **हॉर्टनेट मोबाईल ॲप** तयार केले असून या मोबाईल ॲप च्या वापराबाबत व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्यात यावी.

**२. जिल्हानिहाय व तालुकानिहाय लक्षांक वाटप :-**

- केंद्र शासनाने सन २०१७-१८ करीता अभियानांतर्गत घटकनिहाय मंजूर केलेल्या आर्थिक व भौतिक लक्षांकाच्या मर्यादेत जिल्हानिहाय घटकनिहाय वार्षिक कृति आराखडयास मंजूरी देण्यात आलेली आहे. आपल्या जिल्हयाकरीता मंजूर वार्षिक कृति आराखडयातील घटकनिहाय भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत तालुकानिहाय लक्षांक वाटप करण्यात यावे.

**३. अर्ज प्राप्त झाल्यानंतरची कार्यवाही - लाभार्थी निवड पध्दती :-**

- जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे सोडतीद्वारे लाभार्थी निवडीचे ठिकाण, दिनांक व वेळ तसेच अर्ज स्विकृतीपासून ते सोडतीपर्यंतचे संपूर्ण नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि उपसंचालक व संबधित उपविभागीय कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. तसेच ज्या प्रचलीत योजनामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करावयाची

आहे त्या योजनांकरीता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ही सोडत काढण्यास जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घ्यावी व तदनंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय सोडत काढावयाची आहे. ज्या तालुक्याची सोडत काढावयाची आहे त्याची जबाबदारी संबधित उप विभागीय कृषि अधिकारी व संबधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील. तसेच संबधित उप विभागीय कृषि अधिकारी आवश्यतेनुसार उप विभागातील मंडळ कृषि अधिकारी यांची मदत घेऊ शकतील.

**अ. अर्जदाराची सोडतीद्वारे ज्येष्ठता क्रमवारी निश्चित करणे -**

- निर्धारित लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा अभियान समितीच्या मान्यतेने जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर तालुकानिहाय अर्जांची सोडत काढावयाची आहे. **म्हणजेच सर्व प्राप्त अर्जांची सोडत पध्दतीने निवड सूची तयार करुन क्रमवारी निश्चित करण्यात यावी.**
- तद्नंतर उपलब्ध अनुदान मर्यादेतच निवड सूचीतील क्रमवारीनुसार पूर्वसंमती देण्यात यावी. इतर योजना जसे की राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी करीता सुध्दा वरील निवड सूचितील क्रमांकानुसार पूर्वसंमती देण्यात यावी. आर्थिक वर्षात जसे जसे अनुदान प्राप्त होईल त्याकरीता वरीलप्रमाणे निवड सूचितील क्रमांकानुसारच पूर्वसंमती देण्याची कार्यवाही करण्यात यावी.
- आपल्या जिल्हयातील अनुसूचित जाती व जमाती या प्रवर्गाकरीता निश्चित केलेला निधी केवळ त्याच प्रवर्गातील लाभार्थ्यांकरीता वापरण्यात यावा.

**४. उद्दिष्टा इतके अर्ज प्राप्त न झाल्यास करावयाची कार्यवाही -**

- तालुक्यामध्ये नेमून दिलेल्या उद्दिष्टा इतके अर्ज प्राप्त न झाल्यास त्या तालुक्यासाठी पुनश्चः जाहिरात देवून आठ दिवसात अर्ज मागवावेत आणि प्राप्त होणाऱ्या या अर्जातून लाभार्थी निवडीसाठी उपरोक्त विहीत कार्यपध्दती नुसार कार्यवाही करावी.
- तालुक्यामध्ये दुसऱ्यांदा संधी देवूनही लक्षांकाएवढे अर्ज प्राप्त न झाल्यास, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबधित तालुक्याच्या शिल्लक निधीचे फेर - वाटप त्या जिल्हयामधील निधीची मागणी असलेल्या तालुक्यांना त्यांच्या मूळ लक्षांकाच्या प्रमाणात करावे. सदरची कार्यवाही ऑगस्ट पूर्वी पूर्ण होईल हे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पहावे.
- त्याचप्रमाणे जिल्हयाचा निधी शिल्लक राहत असल्यास, प्रथमतः त्याच प्रादेशिक कृषि विभागातील अन्य जिल्हयास निधीचे फेर - वाटप विभागीय कृषि सहसंचालक यांनी जिल्हयांच्या लक्षांकाच्या प्रमाणात करावे.
- प्रादेशिक कृषि विभागातील काही जिल्हयांचा निधी फेर - वाटपानंतरही शिल्लक राहिल्यास, सदर निधी राज्यस्तरावरुन निधीची मागणी असलेल्या अन्य विभागातील जिल्हयांना, त्यांच्या मूळ लक्षांकाच्या प्रमाणात वाटप करण्यात येईल. असे करताना, लातूर व औरंगाबाद कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमतः सदर निधी मराठवाडयामध्ये उपलब्ध करुन दिला जाईल. तसेच अमरावती व नागपूर विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमतः विदर्भामध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल, आणि पुणे व कोल्हापूर विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमतः पुणे महसूल विभागात उपलब्ध करुन देण्यात येईल. नाशिक कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमतः सदर निधी खान्देश विभागामध्ये उपलब्ध करुन दिला जाईल. ठाणे कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमतः सदर निधी कोकण विभागात उपलब्ध करुन दिला जाईल. सदर कार्यवाही जिल्हयांच्या लक्षांकाच्या प्रमाणात कृषि आयुक्तालयस्तरावरुन संचालक, मराफऔवमं, पुणे यांचेकडून करण्यात येईल.

**५. पूर्वसंमती :-**

- सोडत पध्दतीद्वारे निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रकल्प उभारणीकरीता त्वरीत पूर्वसंमती देण्यात यावी व सदर प्रकल्पांकरीता लाभार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावेत.

**६. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरची कार्यवाही :-**

- लाभार्थ्यानी दाखल केलेल्या प्रस्तावामध्ये प्रामुख्याने खाली नमूद केलेल्या बाबींची पडताळणी करावी.
  १. लाभार्थ्यांचा ७/१२ व ८ - अ चा उतारा
  २. घटकनिहाय मार्गदर्शक सूचनेप्रमाणे नमूद केलेली प्रकल्प प्रस्तावाची विहीत प्रपत्र / करारनामा / हमीपत्र

३. सविस्तर प्रकल्प अहवाल
४. लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास वैध अधिका-याचे प्रमाणपत्र
५. आधार संलग्न बॅंक खाते क्रमांक बॅंक पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स
६. आधार कार्डाची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावती झेरॉक्स)
७. लाभार्थ्याचा भ्रमण ध्वनीक्रमांक

वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव लाभार्थ्याने तालुका कृषि अधिकारी यांना १० कार्यालयीन दिवसात सादर करावयाचा आहे.

**७. कार्यारंभ आदेश :-**

- वरीलप्रमाणे प्राप्त प्रस्तावांची काटेकोर पडताळणी केल्यानंतर आपल्या कार्यालयाद्वारे लाभार्थ्यास प्रकल्प उभारणीकरीता कार्यारंभ आदेश दयावेत.
- लाभार्थीनिहाय मापण पुस्तिका ठेवावी जेणेकरुन मंजूर अंदाज पत्रकानुसार केलेली कामे व वेळोवेळी देण्यात आलेले अनुदान याबाबत निश्चिती करता येईल.
- प्रागतिक खर्च, शिल्लक देय अनुदान इत्यादी नोंदी प्रत्येक मोजमापाच्या गोषवा-यासह ठेवण्यात याव्यात.
- विहीत मुदतीत कामास सुरुवात न केल्यास प्रकल्प उभारणीकरीता देलेली पूर्वसंमती रदद् करावी.

**८. अनुदान वितरण पध्दती :-**

- सन २०१७-१८ मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / जिल्हा अभियान समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावांना देय अनुदान PFMS / CMP प्रणालीद्वारे जिल्हास्तरावरुन वितरीत करावयाचे असल्याने जिल्हास्तरावर आहरण व संवितरण अधिकारी म्हणून संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी काम पहावे.
- ज्या घटकांच्या बाबतीत हॉर्टनेट संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे, अशा घटकांचे वैयक्तिक लाभार्थीस देय अनुदान, हॉर्टनेट संगणक प्रणालीद्वारे करण्यात यावे. इतर घटकांच्या बाबतीत जिल्हा अंमलबजावणी यंत्रणेने, पात्र लाभार्थ्यांना देय अनुदान थेट बॅंकेमार्फत त्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यामध्ये आर.टी.जी.एस.द्वारे वितरीत करावे.
- जिल्हा अंमलबजावणी यंत्रणेने, मंजूर घटकनिहाय आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत अनुदान वितरण करावे.

**९. सोडत प्रक्रियेचे सनियंत्रण :-**

खाली नमूद अधिका-यांनी सोडतीची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होण्याकरीता सनियंत्रण होण्याकरीता सनियंत्रण करावे.

**विभागीय कृषि सहसंचालक** – यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही उपविभागातील किमान एका सोडतीस स्वतः उपस्थित रहावे.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** – यांनी त्यांच्या कोणत्याही उपविभागातील किमान एका सोडतीस स्वतः उपस्थित रहावे. उर्वरीत सोडतीस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील वर्ग एक अधिकारी उपस्थित राहतील.

वरीलप्रमाणे सूचनांचे काटेकोर पालन करुन आपल्या जिल्हयात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची अंमलबजावणी करावी.

**संचालक**
**मराफऔवमं, पुणे**

टिपणी

शाखा - सनियंत्रण
दि.      /०७/२०१७

**विषय :- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (सन २०१७-१८) अंतर्गत घटक / प्रकल्प अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करणेबाबत...**

**संदर्भ** :-१. केंद्र शासनाचे, कृषि सहकारिता व किसान कल्याण विभागाचे ई-मेल पत्र F.No.33-17/2017-MIDH (AAP) दि. २९/०६/२०१७.
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र./मराफऔवमं/सनि/वाकृआ/अंमलबजावणी/१७८६/२०१७, दि.१६/०६/२०१७.

केंद्र शासनाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रू. १४८.२९ कोटी रक्कमेच्या नवीन वार्षिक कृति आराखडयास तसेच रू.१४.०७ कोटी रक्कमेच्या सन २०१६-१७ मधील स्पिल ओव्हर कार्यक्रमास संदर्भ क्रं. १ अन्वये, मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सर्व जिल्हयाकरीता सन २०१७-१८ चा वार्षिक कृति आराखडयास संदर्भ क्र. २ अन्वये मंजूरी देण्यात आली असून भौतिक व आर्थिक लक्षांकाच्या अधिन राहून कोणताही बदल न करता संदर्भिय पत्रातील सूचनांचे पालन करुन कार्यक्रम अंमलबजावणी सुरु करणेबाबत सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सूचित करण्यात आलेले आहे.

तरी राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत घटकांची / प्रकल्पांची अधिक परीणामकारक व यशस्वी अंमलबजावणी होण्याकरीता लाभार्थी निवड पध्दती, लक्षांक वाटप, पूर्वसंमती व कार्यारंभ आदेश इत्यादीबाबत मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करणेबाबत जिअकृअ (सर्व) यांना कळवावे असे वाटते. त्यानुसार अभियान अंमलबजावणीकरीता सर्व जिल्हयांना निर्गमित करावयाच्या मार्गदर्शक सूचना सोबत पत्रामध्ये आपल्या अवलोकनार्थ सादर केलेल्या आहेत.

वरील प्रमाणे मान्य असल्यास जिअकृअ, (सर्व) यांना पाठवावयाच्या पत्राचे प्रारूप पृष्ठ क्रं. ---------- / वर मान्यतेस्तव तथा स्वाक्षरीस्तव सविनय सादर.

**कृषि सहाय्यक**

**तांत्रिक पर्यवेक्षक**

**मा.सहा.प्रकल्प व्यवस्थापक**

**मा.प्रकल्प व्यवस्थापक**

**मा. संचालक**
**मराफऔवमं, पुणे**